



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ८३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०५ नोव्हेंबर २०२४


## प्रदूषणमुक्त दिवाळी संकल्पना हवेत...

## कोट्यवधींच्या फटाक्यांचा आवाज व धूर !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, अकोला :** दिव्यांचा सण दिवाळीनिमित्त कोट्यवधी रूपयांची फटके उडवण्यात आले आहेत. त्यामुळे प्रदूषणमुक्त दिवाळी संकल्पनेला 'फटाके' लागले. कर्णकर्कश आवाज व धुरामुळे आरोग्यासह पर्यावरणाला धोका निर्माण झाला असून प्रदुषणाची पातळी चांगलीच वाढली आहे. दिवाळीच्या आनंदोत्सवात आसमंत उजळून टाकणारी आतषबाजी झाली. दिवाळीला आनंदोत्सव साजरा करताना कोट्यवधी रुपयांचे फटाके उडवण्यात आले. फटाक्यांविरुद्ध विविध स्तरावर मोहीम राबविण्यात येते. ही जनजागृती मोहीम थंडावल्याचे चित्र यावर्षी दिसून आले.

फटाक्यांमधून निळा, पिवळा, हिरवा, लाल, जांभळा रंग निघण्यासाठी अँल्यूमिनिअम, अँन्टमनी सल्फाईड, बेरियम नायटनेट, तसेच तांबे, शिसे, लिथियम, स्टनॅन्शयम, अर्सेनिक यासारख्या घटकाचा वापर केला जातो. फटाके फोडल्यानंतर निघणाऱ्या धुरामुळे अनेक दुर्धर व्याधी होतात. गर्भात असलेली मुले व नवजात मुलांना तर हा अधिकच घातक. यासोबतच चार ते पाच दिवसांत मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्यामुळे अनेक किटक, किडे नाश पावतात. आग लागणे, मुले भाजण्याचे प्रकार घडतात. मात्र,



याकडे दुर्लक्ष करून दिवाळीत फटाके फोडण्याचा मनमुराद आनंद नागरिकांनी लुटला. दिवाळीमध्ये मोठ्या आवाजात फोडण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे पक्ष्यांना नुकसान पोहचते. त्यामुळेही फटाके कमी प्रमाणात फोडण्याचे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले होते. मात्र, त्याचा फारसा परिणाम जाणवला नाही. वसुबारसपासून सुरू झालेली आतषबाजी भाऊबीजेला रात्री उशिरापर्यंत सुरुच होती. काहींनी नियम डावलून रात्री उशिरापर्यंत फटाके फोडण्याचा आनंद घेतला. प्रकाशमय दिवाळी साजरी करताना आपण प्रदुषणाची काळी सावली तर गडद करत नाही ना, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. फटाके हे ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक डेसिबलचे आणि आरोग्यावर कायमस्वरूपी परिणाम करणारे आहेत.

**फटाके फोडण्याची रंगली स्पर्धा**

कर्णकर्कश आवाज करणाऱ्या या फटाक्यांमुळे लहान बालके, रुग्ण, अबाल वृद्ध आणि पशु पक्षी यांच्यासह पर्यावरणालाही हानी पोहोचत आहे. मात्र, फटाके फोडण्याच्या स्पर्धेत याचा विचार होत नाही. आता फटाके फोडण्याची स्पर्धा रंगत असल्याने उत्सवाचे स्वरूप विद्रूप होत चालले आहे. फटाक्यांमुळे आपल्या शरीरावर गंभीर परिणाम होतात, हे माहीत असूनही मोठ्या आवाजात फटाके फोडण्यात येत आहेत. शहरासह ग्रामीण भागातही स्पर्धा दिसून येते.

**मर्यादा ओलांडणारे फटाके**

दिवाळीतील फटाक्यांचा आवाज रक्तदाब वाढवू शकतो. कायमचे बहिरेपण ही येऊ शकते. सुतळी बॉम्ब किंवा पोपटबॉम्ब सारखे फटाके १२० डेसिबल आवाजाची मर्यादा ओलांडतात. ध्वनीप्रदूषण नियंत्रण नियमांनुसार फटाक्यांना आवाजाची मर्यादा ९० डेसिबल इतकी घालून देण्यात आली आहे. शांतता क्षेत्रात आवाजाची मर्यादा ५० डेसिबल आहे. मात्र, शांतता क्षेत्रातील आवाजाची पातळी सर्रास ओलांडली जाते. आकाशात फुटणाऱ्या फटाक्यांची उंची राहत असल्याने, इमारतीत वरच्या मजल्यांवर राहणाऱ्या रहिवाशांना मोठा आवाज सहन करावा लागतो.

## मध्य रेल्वेच्या भोंगळ कारभारामुळे नेरळ-माथेरान-नेरळ मार्गांवरील रेल्वसेवेला विलंब

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०४, माथेरान :** पावसाळा संपला की नेरळ माथेरान या मार्गांवरील ट्रेन सेवा १ ऑक्टोबर रोजी नियमित चालू होत होती.परंतु मध्य रेल्वे प्रशासनाच्या भोंगळ कारभारा मुळे नेरळ माथेरान या मार्गांवर ट्रेन सेवा चालू होण्यासाठी आणखी किती दिवस लागतील हे सांगता येत नाही.




त्याचे मुख्य कारण हे आहे की नेरळ माथेरान नेरळ या मार्गांवर ट्रेन सेवा चालू करण्यासाठी इंजिन उपलब्ध आहेत. परंतु प्रवाशी वर्गाचे डब्बे कोचेस उपलब्ध नाहीत.

सद्या उपलब्ध असले प्रवाशी वर्गाचे डब्बे यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी हे डब्बे दर दोन वर्षानी कुर्डुवाडी येथे पाठविण्यात येतात त्याला उशिर झाल्यामुळे हे डब्बे परत नेरळ येथे आणन्यास किती विलंब लागेल हे सांगणे कठीण आहे. त्या मुळे नेरळ माथेरान या मार्गांवरील ट्रेन सेवा चालू करण्यासाठी अजून किती दिवस लागतील याची शास्वती नाही.

दिवाळीचे सीजन संपून सुरुवात होऊन संपून संपण्याच्या मार्गावर आहे येणारे पर्यटक मिनी ट्रेनच्या सफारीसाठी खास माथेरानला येत असतात परंतु रेल्वे प्रशासनाच्या भोंगळकारभारा मुळे नेरळ माथेरान नेरळ मिनी ट्रेन सुरू होऊ शकली नाही त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड झाले आहे .रेल्वे प्रशासनाचे विविध डिपार्टमेंट यासाठी सर्वस्वी जबाबदार आहेत. संपूर्ण माथेरान मध्ये स्थानिक पातळीवर आणि पर्यटकांकडून रेल्वेच्या या दिरंगाईमुळे तीव्र पडसाद उमटताना दिसत असताना सुद्धा रेल्वे प्रशासनाकडून नेरळ माथेरान नेरळ मिनी ट्रेन सुरू होण्याबाबत अजूनही कोणती ठोस उत्तर दिले जात नाही, २६ जुलै २००६ रोजी प्रलयकारी पावसाने रेल्वेला जो आघात दिला त्या आघातातून नेरळ माथेरान नेरळ रेल्वे सेवा अजूनही सावरली गेली नाही हे मोठे दुर्दैव्य, गेल्या २०वर्षांमध्ये रेल्वेने प्रशासनाने अनेक सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काम केली आहेत करत आहेत, परंतु नेरळ माथेरान नेरळ ही सेवा देण्यास रेल्वे प्रशासन असमर्थ ठरली आहे, केवळ नेरळ माथेरान नेरळ दोन दोन फेऱ्या सुरू करून पर्यटकांची माथेरानरांची थट्टा करत आहे,नेरळ माथेरान या मार्गांवरील ट्रेन सेवेत वाढ करण्यासाठी प्रवाशी वर्गाचे व गुड्स चे नविन डब्बे बनवून मिळावेत तसेच नेरळ माथेरान ट्रेनच्या सोडविण्याबाब माथेरान चे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते जनार्दन शंकर पारटे. यांनी DRM² (CR) यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. सेंट्रल रेल्वे प्रशासनाकडून आज उशिरा जाहीर झालेल्या पत्रकानुसार दिनांक ६/११/२०२४ रोजी नेरळ माथेरान नेरळ मिनी ट्रेन सेवा सुरू होत आहे

## अहिल्यानगर शहरात रंगणार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार

### अहिल्यानगर जिल्हा तालीम संघाचा पुढाकार...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.४, अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने अहिल्यानगर मध्ये अहमदनगर जिल्हा तालीम संघाच्या माध्यमातून महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा डिसेंबरमध्ये रंगणार आहे. नुकतेच सर्जेपुरा येथील जिल्हा तालीम संघाच्या कार्यालयात पदाधिकारी व सदस्यांची बैठक पार पडली. यामध्ये महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा घेण्याचे जाहीर करण्यात आले.

शहर तालीम संघाचे अध्यक्ष नामदेव लंगोटे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. शहरात महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा घेण्यासाठी सुचवण्यात आलेल्या प्रस्तावाला सर्वांच्या वतीने खजिनदार तथा नगर तालुका सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी अनुमोदन दिले. जिल्हा तालिम संघाचे अध्यक्ष पै.



वैभव लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीला माजी नगरसेवक पै. सुनील भिंगारे, पै. श्याम लोंढे, पै. संतोष कोतकर, कुस्ती पंच पै. गणेश जाधव, पै. युवराज पठारे, पै. विक्रम बारवकर, पै. बबलू धुमाळ, पै. संदीप बारगुजे, पै. पप्पू शिरसाठ, पै. सुनील अडसुरे, पै. प्रताप चिंधे, पै. दीपक डावखर, पै. मिलिंद जपे, पै. अजय अजबे, पै. विलास चव्हाण, भागवत पाटील, नगर तालुका तालिम सेवा संघाचे सचिव पै. बाळासाहेब भापकर, उपाध्यक्ष पै. संदिप डोंगरे, पै. अनिल गुंजाळ, पै. हर्षवर्धन कोतकर, पै. मोहन हिरणवाळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेने अहिल्यानगर मध्ये महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा घेण्यासाठी अनुमती दर्शवली आहे. ही स्पर्धा कुस्तीगीर परिषदेचे सरचिटणीस पै. बाळासाहेब लांडगे, अर्जुन वीर पुरस्कार प्राप्त पै. काका पवार, पै. विजयबराटे, पै. सर्जेराव शिंदे,पै. भरत मेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. या स्पर्धेसाठी जिल्हा तालीम संघाच्या वतीने नियोजन सुरू असून, दिमाखदार पद्धतीने ही स्पर्धा घेतली जाणार असल्याची माहिती तालिम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे यांनी दिली.

## सख्या भावानेच केला सख्या भावाचा खुन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.०४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील पार्डी वैजापुर याठिकाणी शेतातील आखाड्या वरील मुरुमाच्या क्षुल्लक कारणावरून सख्या भावानेच केला भावाचा खुन केल्याची धक्कादायक घटना दि.२ शनिवारी रोजी सायंकाळी घडली आहे. पार्डी वैजापुर येथील बालाजी महाजन पवार तसेच दत्तराव महाजन पवार यांच्यात शेतातील आखाड्या वरील मुरुमाच्या शुल्लक कारणावरून वाद झाला. भांडण विकोपाला गेल्याने तुंबळ हाणामारी झाली या भांडणात बालाजी महाजन पवार यांना सखा भाऊ दत्तराव पवार पुतण्या प्रविण पवार, पवन पवार, यांनी बेदम मारहाण केली. बालाजी पवार यांना डोक्यात जबर मार लागल्याने त्यांचा या भांडणात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते परंतु त्यापुर्वीच बालाजी पवार यांचा मृत्यू झाल्याचे वैदयकिय अधिकारी यांनी सांगीतले आहे. या घटनेनची माहिती कळताच बारड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक संतोष केदासे, जमादार कारंजकर, यांनी घटनास्थळी भेट दिली.

## दिवाळीत ६० ठिकाणी आगीच्या घटना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पुणे :** दिवाळीत ६० ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. बहुतांश ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत. सुदैवाने आगीच्या घटनांमध्ये कोणी गंभीर जखमी झाले नाही.

दिवाळी शहर, तसेच उपनगरात आग लागण्याच्या घटना घडतात. यापार्श्वभूमीवर अग्निशमन दलाकडून यंदा 'सुरक्षित दिवाळी, आनंदी दिवाळी' मोहिम राबविण्यात आली. अग्निशमन दलाच्या जवानांकडून ध्वनीवर्धकावरुन शहराच्या वेगवेगळ्या भागात नागरिकांनी सुरक्षित दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले. दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्वाधिक आग लागण्याच्या घटना घडल्या. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शुक्रवारी (१ नोव्हेंबर) सायंकाळी सात ते मध्यरात्रीपर्यंत शहराच्या वेगवेगळ्या भागात ३६ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. पाडव्याच्या दिवशी शहरात १४ ठिकाणी, तसेच भाऊबीजेच्या दिवशी फटाक्यामुळे ४ ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. दिवाळी सुरु झाल्यानंतर शहर, तसेच परिसरात एकूण मिळून ६० ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.

## पारनेर विधानसभा मतदारसंघात बहुरंगी लढत

### कोण ठरणार सरस ; सुजित झावरे यांनी सोडले मैदान




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर नगर विधानसभा मतदार संघातील आज दुपारी ३ वाजता उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची मुदत संपली. त्यामुळे आता कोणकोणामध्ये लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून महाविकास आघाडी कडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून राणीताई निलेश लंके या आहेत. त्यांच्या विरोधात महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अधिकृत उमेदवार काशिनाथ दाते हे उमेदवार आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडी व महायुती मध्ये सुद्धा बंडाळी झाल्याचे दिसून आले आहे. महाविकास आघाडीत जिल्हा परिषद माजी सदस्य व शिवसेना नेते संदेश कार्ले यांनी बंड केलेले आहे. तसेच महायुती बरोबर गेलेले पारनेरचे माजी नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी यांनीही आपला अर्ज अपक्ष म्हणून ठेवला आहे. तसेच विधानसभेचे माजी उपाध्यक्ष माजी आमदार विजय भास्करराव औटी यांनीही आपला अपक्ष उमेदवारी अर्ज निवडणूक रिंगणात ठेवला आहे. इतरही अपक्ष उमेदवारांचे अर्ज राहिलेले असल्याने पारनेर नगर विधानसभा मतदार संघात मुख्य लढती मध्ये पंचरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. महाविकास आघाडी व महायुती या दोन्ही आघाड्यांमध्ये बंडाळी झाली असल्याने आता निवडणुकीत खऱ्या अर्थाने रंगत आलेली आहे. विधानसभेच्या रणसंग्रामाला खऱ्या अर्थाने सुरुवात झालेली असून पारनेर नगर विधानसभा मतदार संघात आज आठ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. असून खऱ्या अर्थाने होणाऱ्या लढतींचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. यामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत तान्हाजी पठारे यांनी आज सकाळी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांचा थेट फोन आल्यानंतर त्यांच्या आदेशाचे पालन करत उमेदवारी अर्ज माघारी घेतला असून त्यांनी महाविकास आघाडीचा धर्म पाळणार असल्याचे सांगितले. त्याच बरोबर माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे यांनीही आपला उमेदवारी अर्ज माघारी घेत महाविकास आघाडीच्या उमेदवार राणीताई लंके यांना जाहीर जाहीर केला. तसेच जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनीही आपला उमेदवारी अर्ज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क साधून माघारी घेतला असून त्यांनी आपला पाठिंबा अद्याप कोणालाही स्पष्टपणे जाहीर केलेला नाही ते लवकरच भूमिका स्पष्ट करतील.

अक्षराज

## संपादकीय



### किंग कोहली...

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा आज ३६ वा वाढदिवस. किंग कोहलीला वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा! क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्न संपूर्ण क्रिकेट विश्वाला पडला होता. ज्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्न विचारण्यात आले की तुझा विश्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५० एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८० शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल यात शंका नाही कारण आज त्याच्या नावे ८० शतके आहेत. कसोटीत त्याने २९ शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५० शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३६ वर्षाचा होत आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी तीन -चार - वर्ष सहज खेळू शकतो. त्यामुळे तो हा विक्रम सहज मोडेल. विशेष म्हणजे त्याच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रम वीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा बारा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियात झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो. मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने ७० धावा काढून भारताला विश्व विजयी केले होते. या दोन खेळी फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. टी २० विश्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता यावर्षी होणाऱ्या विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे अशी क्रिकेटप्रेमींची त्याच्याकडून अपेक्षा आहे. सध्या तो त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाहीये मात्र तो असा खेळाडू आहे जो कधीही फॉर्मात येऊ शकतो. तो लवकरच त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतेल आणि भारताला कसोटी आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवून देईल यात शंका नाही.

विराटला पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# येणारी दिवाळी फटाकेमुक्त साजरी होईल का ?

गतवर्षीच्या तुलनेत यंदा दिवाळीपूर्वी मुंबईसह प्रमुख शहरांतील हवेची गुणवत्ता चांगली असल्याने यंदा फटाके फोडण्यावर तितकेसे निर्बंध आणण्यात आले नव्हते. ज्याचा लाभ बच्चे कंपनीसह तरुण मंडळींनी मोठ्या प्रमाणात उचलला. शेवटी अपेक्षित तेच झाले. फटाक्यांच्या धुरामुळे मुंबईतील शिवडी, भायखळा, मालाड, कांदिवली, देवनार यांसारख्या भागातील हवेची गुणवत्ता कमालीची घसरून परिस्थिती चिंताजनक बनली. हवेचा गुणवत्ता निर्देशांक घसरून २०० ते ३०० च्या दरम्यान गेला. लोकसंख्येची दाटीवाटी, विकासकामांमुळे हवेत मिसळलेले धूलिकण, वाढलेल्या वाहन संख्येमुळे प्रतिदिन होत असलेले वायुप्रदूषण आणि त्यातच फटाक्यांच्या धुरामुळे प्रदूषणाने गाठलेली कमाल मर्यादा यांमुळे या चार दिवसांत गर्भवती स्त्रिया, वयस्क, दमा, हृदयविकार असलेल्या रुग्णांना जीव मुठीत घेऊन जगावे लागले. पुणे आणि ठाणे शहरातील स्थितीही याहून वेगळी नव्हती. रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी असली, तरी शहरी भागांत दिवाळीच्या दिवसांत याहीवर्षी रात्रभर फटाके वाजतच होते. या सर्वांचा लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन खासगी तसेच सरकारी दवाखान्यांसमोर रुग्णांच्या रांगा लागलेल्या दिसून आल्या. प्रदूषणामुळे घसा खवखवणे, खोकला, सर्दी, श्वास घेण्यास त्रास होणे, ताप, डोळे जळजळणे यांसारख्या आजारांनी नागरिक त्रस्त झालेले दिसून आले. यामध्ये लहान मुलांची संख्या अधिक होती.

दरवर्षी फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडतात ज्यामध्ये वित्त हानी तर होतेच शिवाय काहीवेळा आकस्मिक आग लागल्याने जीवित हानीही होते, अपंगत्व, अंधत्व आणि बहिरेपणाही येतो. एकट्या संभाजी नगरमध्ये दिवाळीनिमित्त फटाके फोडताना ४० जण भाजल्याच्या घटना दिवाळीच्या दिवशी घडल्या आहेत. त्यातील १९ रुग्णांना घाटी रुग्णालयात, तर २१ रुग्णांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. भुईनळ्याचा स्फोट झाल्याने एका १२ वर्षांच्या मुलाचा डोळा निकामी झाला, तर सुतळी बॉम्ब हातात फुटल्याने एकाचा पूर्ण हात भाजला. जळता फटाका रिक्षावर पडल्याने येथील एका रिक्षाने पेट घेतल्याची घटना यंदा समाजमाध्यमांवर चांगलीच व्हायरल झाली. शुक्रवारी लक्ष्मी पूजनाच्या दिवशी केवळ पुण्यात ३१ ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या. यामध्ये जीवित हानी झाली नसली, तरी वित्तीय हानी मात्र कमालीची झाली आहे. कासारगोड जिल्ह्यातील नीलेश्वरमजवळील मंदिर उत्सवादरम्यान फटाक्यांची आतषबाजी करताना मोठा स्फोट झाला. या दुर्घटनेत १५० हून अधिक जण जखमी झाले, त्यापैकी आठ जण गंभीररित्या भाजले होते. भाग्य नगरमधील एका फटाक्याच्या दुकानाला आग लागल्याने दुकानाजवळ उभ्या केलेल्या १० दुचाकी जाळून खाक झाल्या. फटाक्यांच्या दुकानाशेजारील एक दुकानही या आगीच्या भक्षस्थानी पडले. वरील उदाहरणे केवळ वानगीदाखल असून देशातील सर्वच भागांत दिवाळीदरम्यान फटाक्यांमुळे आगी लागण्याच्या लहान मोठ्या घटना घडतात ज्यामध्ये प्रचंड प्रमाणात वित्तीय हानी होते. अनेकदा या आगीत निष्पापांचे जीव जातात, तर अनेक जण कायमचे जायबंदी होतात. फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी भांडणे होतात, प्रसंगी मारामाऱ्या होऊन एकमेकांची डोकीही फोडली जातात. या दिवसांत अग्निशमन दलावर आणि पोलीस प्रशासनावर प्रचंड ताण असतो.

दिवाळी खरेतर नातेवाईकांसोबत एकत्र साजरा करण्याचा सण; मात्र फटाक्यांचा जीवघेणा धूर आणि आवाज नको म्हणून शहरातील श्वसनविकार, हृदय विकार असणारे अनेक जण दिवाळीच्या आधीच गावी किंवा शहराबाहेर मित्रमंडळींकडे, अन्य नातेवाईकांकडे काही दिवसांसाठी राहायला जातात. जे इथे आपल्या नातेवाईकांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी थांबतात त्यांना फटाक्यांच्या प्रदूषणामुळे जीव नकोसा होऊन जातो. गर्भवती स्त्रिया, मनोरुग्ण यांनाही फटाक्यांच्या आवाजाचा आणि विषारी वायूचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. कुत्रे, मांजरी यांसारखे पाळीव प्राणी, पक्षी यांच्या आरोग्यावरही फटाक्यांचा विपरीत परिणाम होतो ज्यामुळे ते भयभीत होऊन सैरावैरा धावू लागतात. भीतीमुळे अनेकदा हे प्राणी आणि पक्षी जीवसुद्धा गमावतात. सोलापूर जिल्ह्यातील चिंचणी नावाचे एक गाव आहे. या गावातील शेतकरी किरण जाधव यांच्या घरी पोमेरेनियन जातीचा भालू नामक पाळीव कुत्रा होता. . जाधव यांच्यासह संपूर्ण गावाला भालूचा लळा लागला होता. १० वर्षांपूर्वी दिवाळीत फटाक्यांच्या आवाजाला घाबरून भालूने जीव सोडला. भालूच्या मृत्यूमुळे गावातील ४५० नागरिक हळहळले. भालूच्या मृत्यूमुळे ग्रामस्थांनी गावात फटाके बंदीचा निर्णय घेतला. तेव्हापासून आजपर्यंत दिवाळीच्या काळात गावातील कोणीच फटाके वाजवत नाहीत. परंपरागत पद्धतीनुसार दिवाळी साजरी करतात. भालूच्या स्मृतिप्रीत्यर्थ ग्रामस्थांनी गावात १० हजार झाडे लावली. त्यामुळे एकेकाळी ओसाड असलेले हे गाव आज हिरवळीने बहरले आहे. जी बाब चिंचणीसारख्या छोट्याशा गावातील लोकांच्या लक्षात आली ती शहरातील सुशिक्षित लोकांच्या केव्हा लक्षात येणार ?

फटाके आणि भारतीय संस्कृतीचा, हिंदू धर्माचा काडीमात्र संबंध नसताना फटाके फोडून दिवाळी साजरी करणे म्हणजे काहीतरी धर्मभिमान जपणे असा समज काही मंडळींचा झालेला दिसून येतो. ख्रिती वर्षाच्या स्वागतार्थ जगभर फटाके फोडले जातात त्यांना कोणीच विरोध करत नाही, मग हिंदूंच्या दिवाळी सणातच फटाक्यांना विरोध का ? असा सूर या दिवसांत ऐकू येऊ लागतो. यातही काही चुकीचे नसून भारतात ३१ डिसेंबरच्या रात्री फोडल्या जाणारा फटाक्यांवरही खरेतर बंदी आणायला हवी. फटाक्यांमुळे कोणतेही लाभ होत असून फटाक्यांमुळे होणारे नुकसान मात्र अपरिमित आहे. दिवाळी हा दिव्यांचा सण आहे. तिमिराकडून तेजाकडे जाण्याची शिकवण देणारा सण आहे ; मात्र दिवाळीतील जीवघेण्या फटाक्यांमुळे आपला प्रवास तेजाकडून तिमिराकडे चालला आहे कि काय असे वाटू लागते. प्रकाशाचे महत्व सांगणाऱ्या या सणानिमित्त फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे देशात दरवर्षी सुमारे ५ हजार जणांना आपली दृष्टी गमवावी लागते. दिवाळी आणि फटाक्यांचा काहीच संबंध नाही. फटाक्यांची निर्मिती केवळ आतषबाजीसाठी करण्यासाठी करण्यात आली आहे. दिवाळीच्या काळात आतषबाजी करावी असा उल्लेख कोणत्याही प्राचीन ग्रंथांत अथवा धर्मशास्त्रात नाही, मग दिवाळीसारख्या पवित्र सणात ही प्रदूषणाची खैरात कशासाठी ? फटाक्यांमुळे क्षणिक सुख मिळते मात्र त्यापासून होणारे नुकसान कैकपटीने अधिक असते.

केवळ दिवाळीच्या काळात अब्जोवधी रुपयांच्या फटाक्यांचा निव्वळ धूर होतो. ज्या देशाचा काही भाग आजही दारिद्र्य रेषेखाली जगत आहे, ज्यांना दिवसातून २ वेळा अन्न मिळणेही दुरापास्त आहे,अशा देशात फटाके फोडण्यात आणि त्यापासून होणारे नुकसान निस्तरण्यात अब्जोवधी रुपये खर्च होत असतील तर ते देशाला नक्कीच परवडणारे नाही. ज्या गोष्टी धर्मशास्त्रात नाहीत आणि जर त्यामुळे सामाजिक स्वास्थ बिघडणार असेल तर अशा बाबींवर बंदी आणणेच योग्य आहे. फटाक्यांमुळे होणारी वित्त आणि जीवित हानी, फटाक्यांच्या बाबतीत न्यायालयाला करावा लागणार हस्तक्षेप, या दिवसांत प्रशासनावर पडणारा अधिक भार या सर्व बाबी लक्षात घेऊन फटाके फोडण्यावर केंद्र सरकारने देश पातळीवर बंदी आणायला हवी. फटाक्यांमुळे होणारी हानी लक्षात घेऊन फटाक्यांच्या दुष्परिणामांची जाणीव शाळा महाविद्यालयांतून करून द्यायला हवी. दिवाळीला फटाके फोडणे ही आपली संस्कृती नव्हे, याचे ज्ञान पालकांनीही आपल्या पाल्यांना करून द्यायला हवे. दीपावलीच्या प्रकाशाला आलेली फटाक्यांची काजळी दूर करण्याचे कर्तव्य आपलेच असून आपली संस्कृ, आपला धर्म वाचवायचा असेल, तर आपले सणसुद्धा शास्त्रोक्त पद्धतीनेच साजरे व्हायला हवेत !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# डीएन नगर मनपा शाळेचे मुला-मुलींचे रब्बी संघ विजेते

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०४, मुंबई :** नुकत्याच पार पडलेल्या विभागीय रग्बी स्पर्धेत अंधेरी येथील डी एन नगर मनपा शाळेचा मुलांचा व मुलींचा असे दोन्ही रग्बीचे संघ विजेते ठरले असून हे संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की मुंबई उपनगर जिल्हास्तरावर विविध सांघिक व वैयक्तिक स्वरूपाच्या क्रीडा स्पर्धा महाराष्ट्र शासना तर्फे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात येतात. यामध्ये कुस्ती, जुडो, कराटे, बॉक्सिंग या वैयक्तिक खेळांसह मैदानी स्पर्धा व कबड्डी, खो-खो, क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, रग्बी यासारख्या सांघिक खेळांचाही समावेश असतो. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डी एन नगर एमपीएस शाळेच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने अगदी सुरुवाती पासूनच आक्रमक खेळी करत प्रत्येक टप्प्यावर विजय मिळवत गेले.जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आलेल्या रग्बी स्पर्धेमध्ये सहभागी असलेल्या सर्व संघांना पराजित करून या दोन्ही संघानी प्रथम क्रमांक पटकावला होता. प्रथम क्रमांक पटकावलेले संघ पुढील स्तरावर म्हणजेच विभागीय स्तरावर खेळण्यासाठी पात्र होतात.नुकत्याच पार पडलेल्या विभागीय स्पर्धेत या शाळेच्या मुलांच्या संघाने रायगड जिल्ह्याच्या संघाला मोठ्या फरकाने हरवत प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे हा संघ ही राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. तसेच मुलींच्या संघानेही उत्कृष्ट खेळ खेळून प्रथम क्रमांक पटकावला. आणि हा संघ देखील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. विशेष म्हणजे या शाळेच्या मुलींचा संघ सलग तिसऱ्यांदा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. तर मुलांचा संघ सलग दुसऱ्या वर्षी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

या दोन्ही संघांच्या यशासाठी या शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक ओमकार तळेकर यांनी प्रचंड मेहनत घेतली असून खऱ्या अर्थाने त्यांची मेहनत फळाला आली आहे. या दोन्ही संघांनी मिळवलेल्या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका समीना क्वाटेवाला, रक्षा पटेल, अमोल पाटील,स्मिता बाजी,यांच्यासह शा शि चे वरीष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे, पर्यवेक्षक दत्तू लवटे आणि कनिष्ठ पर्यवेक्षक बाबासाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे व शाळेचे अभिनंदन केले असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### फसवा..

रंगीबेरंगी हो अस्मान
ऋतु बदलते वसुंधरा
बदलाव अति जरुरी
चुकला रस्ता सुधरा

सुसाट आगळा वारा
कास नाविन्याचीधरा
अदला बदला जरुरी
स्पष्टता फुलते अधरा

गार्डन फ्रेश प्रॉडक्टस्
डायरेक्ट येई बाजारा
कोरीकरकरीत रे पोरे
आगळा दिसे नजारा

तिकीट दे जल्लोषात
सुसंधी नव उमेदवारा
उमेद आणली पक्षांत
सळाळे उत्साहे वारा

बाप होई पाय उतारा
तिकीट आपल्यापोरा
सिंहासन स्थान बध्द
सत्ता तशीचं परिवारा

तरूणाईला देई संधी
फसवे किती मतदारां
ठरवा कुणा निवडावे
प्रचारास येता स्वदारा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# आचारसंहितेचे पालन करताना जाणून घ्या 'काय करावे' आणि 'काय करू नये'

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ जाहीर होऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य आणि नि:पक्षपाती वातावरणात निवडणुका पार पडाव्यात यासाठी भारत निवडणूक आयोगाने काही नियम ठरवून दिले आहेत. या नियमांनाच 'आचारसंहिता' म्हटले जाते. निवडणूक घोषित झाल्यापासून सर्वच राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी या आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. आचारसंहिता अधिक विस्तृत असल्याने त्यापैकी निवडणूक काळात राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी 'काय करावे'आणि 'काय करू नये' याबाबत काही महत्त्वाची तत्वे सांगितलेली आहेत.

**आचारसंहिता काळात काय करावे?**

निवडणूक घोषित होण्यापूर्वी सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील. पूर, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी मदतीचे कार्य सुरू ठेवता येईल. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रकमेची किंवा इतर वैद्यकीय मदत देता येईल. इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका ही त्यांची धोरणे, पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी. स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.

प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक किंवा इतर सुविधांचा वापर करण्याची परवानगी मिळवावी आणि ते वापरण्याच्या नियमांचे पालन करावे. सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या, सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. मिरवणूक सुरू होण्याची तसेच संपण्याची वेळ व जागा आणि ती जिथून जाणार असेल तो मार्ग अगोदर निश्चित करून पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मतदारांना पुरविण्यात येणाऱ्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.

**आचारसंहिता काळात काय करू नये?**

निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे पालन करताना राजकीय पक्ष तसेच उमेदवारांना सत्ताधारी पक्ष/शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात करण्यास प्रतिबंध आहे. उमेदवार आणि मतदानासाठी आलेला मतदार यांच्याशिवाय इतर कोणाही मंत्र्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही. शासकीय काम आणि निवडणूक मोहीम/ निवडणूक प्रचार यांची सरमिसळ करू नये. इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. वेगवेगळ्या जाती, समूह आणि धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष, तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करू नये. सर्व धर्मिय प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासाठी करू नये. मतदारांना लाच देणे, दारुचे वाटप करणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण वा धाकदपटशा दाखविणे, तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासांत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यांसारख्या गोष्टींना मनाई आहे.

इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करू नये. ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत. याचबरोबर मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाजवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

आचारसंहितेच्या या तत्त्वांचा भंग झाल्याचे नागरिकांना आढळल्यास त्यांनी सी-व्हिजील ॲपवर ध्वनीमुद्रण, ध्वनीचित्रमुद्रण या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

**- मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**
**तथा नोडल अधिकारी,**
**एकत्रित मीडिया कक्ष आणि**
**सदस्य सचिव माध्यम प्रमाणिकरण व**
**सनियंत्रण समिती, ठाणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जनसेवा फाउंडेशन यांची दिवाळी निमित्त अनोखी भेट



**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.०४, मोखाडा :** मोखाडा जन सेवा फाउंडेशन भारत यांच्या मार्फत दिवाळी निमित्त जांभूळवाडी,जव्हार येथे गरीब गरजू लोकांना कपडे वाटप करण्यात आले यावेळी जनसेवा फाउंडेशन चे अध्यक्ष सचिन पाटील,संपर्क प्रमुख राजेश भालींगे व पदाधिकारी उपस्थित होते.

दिवाळी ही समाजाच्या प्रत्येक घटकात खेड्या पाड्यातील लोकांन सोबत साजरी करावी या हेतूने जनसेवा फाउंडेशन यांनी एक पाऊल उचलून सर्व सामान्य जनतेच्या सेवे साठी व त्यांना एक छोटीसी मदत म्हणून गाव पाड्यात जाऊन समाज बांधवांना दिवाळी निमित्त कपड्याचे वाटप करण्यात आले यावेळी लहान मुलांचे कपडे ते मोठ्या माणसाचे स्त्री पुरुषाचे कपडे वाटप करण्यात आले यावेळी जमलेल्या लोकांन मध्ये त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद होतो. यावेळी जमलेल्या लोकांनी जनसेवा फाउंडेशन चे आभार मानले व अशीच मदत आपल्या हातून व्हावी व आपल्या संस्थेचे नाव खूप मोठे व्हावे अश्या शुभेच्छा दिल्या.यावेळी जनसेवा फाउंडेशन भारत च्या पदाधिकाऱ्यांनी ही उपस्थित जनतेचे आभार मानले व ही एक छोटीसी भेट असल्याने यापुढे ही आपणास मोठ्या प्रमाणात भेट देऊन आपली दिवाळी साजरी करू असे जनसेवा फाउंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## दिवाळी दिपोत्सवांनी उजळला सुंदरगड





**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि,०४, पाटण :** पाटण महालातील प्रमुख असलेल्या व छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सुंदरगड (दात्तेगड) वर रविवारी दिवाळी दिपोत्सव साजरा करण्यात आला. गडाच्या मुख्य दरवाजा असणाऱ्या खंजीर दरवाजा दिवाळी पणत्यांनी उजळून निघाला. खंजीर दरवाजा प्रवेश व्दारात असणाऱ्या गणपती, वीर हनुमान पणत्यांच्या या लख प्रकाशात उजळून निघाले. सुंदर स्वराज्य प्रतिष्ठान, सुंदरगड संवर्धन समितीच्या मावळ्यांनी हा दिपोत्सव साजरा केला.

यावेळी गडपुजन, गडावरील ध्वज पुजन, देव-देवतांचे पुजन करण्यात आले. इतिहासाची साक्ष असणारा पाटण महालातील सुंदरगड हे पाटण तालुक्याचे इतिहासीक वैभव आहे. या वैभवाचे संवर्धन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार-अचार आणि धार्मिक परंपरा याचे जतन करत सुंदरगड संवर्धन समितीच्या मावळ्यांनी किल्ले सुंदरगडावर शिवपरंपरा कायम ठेवली आहे. पाटण महालातील सुंदरगड हा पाटणच्या शिवकालीन इतिहासाची साक्ष आहे. शिवकाळात पाटण महालातील प्रत्येक घरातील व्यक्तीचे योगदान आहे. इतिहासातील पुर्वजांचे योगदान आजच्या काळात विसरता येणार नाही. आपल्या पुर्वजांची आठवण मनात जतन ठेवून हा दिवाळी दिपोत्सव साजरा करण्यात आला. यामुळे शिवकालीन इतिहास आजच्या पिढी समोर येत आहे. याचा सार्थ अभिमान वाटत असल्याचे सुंदर स्वराज्य प्रतिष्ठान, सुंदरगड संवर्धन समितीच्या शिवप्रेमी मनोहर यादव, अविनाश पराडकर, राम साळुंखे, शंकर मोहिते, लक्ष्मण चव्हाण या मावळ्यांनी सांगितले.

## हदगाव शहर व ग्रामीण भागात खुलेआम गुटखाविक्री

**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०४, हदगांव (नांदेड) :** हदगाव शहरामध्ये राजरोसपणे अवैध गुटख्याची वाहनाद्वारे आयात करून शहरासह ग्रामीण भागात जीवघेण्या गुटखा व सुगंधी तंबाखू ची खुलेआम विक्री सुरू आहे या अवैध धंद्यात दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याचे पाहावयास मिळत आहे अन्न व औषध प्रशासन लक्ष्मी दर्शनाच्या माध्यमातून धृतराष्ट्राची भूमिका घेत गुटखा तस्कर यांची पाठराखण करीत असल्याचे पाहावयास मिळत आहे हे हिमायतनगर या शहरातून चार चाकी च्या माध्यमातून हदगाव शहरात मोठ्या प्रमाणात गुटख्याची सकाळी तीन ते चारच्या सुमारास आयात केली जात आहे. हिमायतनगर हदगाव या दोन ठिकाणावरून अनेक शहरासह ग्रामीण भागात गुटखा पोहोचविला जातो तालुक्यात ग्रामीण भागातील सर्वच किराणा दुकानात, कॅन्टींग पान टपरी धारकाच्या दुकानासमोर गुटखा तस्कर मोटरसायकल उभी करून त्यांना गुटका व सुगंधी तंबाखू पोहोचवीत व दर्शनी भागात गुटख्याची माळ लावून राजरोसपणे विक्री केल्या जाते हा सर्व प्रकार औषध प्रशासन अर्थपूर्ण संबंध जोपासत कारवाई करण्यास धजावत नाही. गुटख्यात मॅग्नेशियम कार्बोनेट सारख्या घातक घटकांमुळे कर्करोगासारख्या गंभीर आजार होण्याची शक्यता सुद्धा आहे तंबाखूजन्य पदार्थामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडू नये यासाठी राज्य सरकारने २०१२ मध्ये गुटख्याच्या तंबाखूजन्य सुपारी पान मसाल्याच्या पदार्थाची निर्मिती आणि विक्रीवर बंदी घातली आहे.

## बसपाचे नवी मुंबईतील दोन्ही उमेदवार सर्व ताकतीने रिंगणात

**अक्षराज : जे. के . पोळ**

**दि.०४, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक २०२४ करिता बहुजन समाज पार्टी तर्फे नवी मुंबई येथून १५० ऐरोली विधानसभा व १५१ बेलापूर विधानसभा येथून उमेदवार निश्चित करण्यात आले आहेत. बहुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुश्री. बहन मायावती यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील डोंगरे यांच्या निर्देशानुसार, ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष भालेराव यांच्या मार्गदर्शनानुसार, नवी मुंबई अध्यक्ष प्रा.दत्ता हेगडे यांच्या अध्यक्षतेखाली १५० ऐरोली या विधानसभेतून अरविंदसिंह शीराम राव आणि १५१ बेलापूर विधानसभेतून शिवशरण मल्लिकार्जुन पुजारी यांनी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक आयुक्तांकडे सादर केले होते.

निवडणूक आयोगाद्वारे स्क्रूटनी मध्ये उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून त्यांना अधिकृत उमेदवार म्हणून मान्यता मिळालेली आहे. ४ नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची तारीख ओलांडली असून यातल्या कोणीही आपले अर्ज मागे घेतलेले नाहीत. त्यामुळे १५० ऐरोली विधानसभा येथून बहुजन समाज पार्टीचे नवी मुंबई उपाध्यक्ष अरविंदसिंह शीराम राव आणि १५१ बेलापूर विधानसभा येथून धनगर, ओबीसी समाजाचे नेते शिवशरण मल्लिकार्जुन पुजारी हे बहुजन समाज पार्टीचे अधिकृत उमेदवार असल्याचे निश्चित झाले आहे. तसेच बहुजन समाज पार्टी ही राष्ट्रीय पार्टी असून, हत्ती ही बीएसपी ची रजिस्टर्ड निशाणी असल्यामुळे 'हत्ती' हेच चिन्ह त्यांना मिळणार हे निश्चित असून, उमेदवारांनी आपला प्रचार चालू केला आहे. असे बीएसपी नवी मुंबई अध्यक्ष प्रा. दत्ता हेगडे यांनी कळविले आहे.

## गुहागर मतदारसंघात आजपासून मनसेचे प्रमोद गांधी यांच्या प्रचाराचा झंझावात



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०४, गुहागर :** महाराष्ट्रातील २६४ गुहागर मतदारसंघात या निवडणुकीत चुरशीची लढत होणार असून, सर्वच पक्षीय उमेदवार याठिकाणी आपापला प्रचार करण्यात मग्न झाले आहेत, याठिकाणी प्रचारात मनसे आघाडीवर असून आज मंगळवार दिनांक ५ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८.३० वा गुहागर व्याडेश्वर मंदिर येथे मनसेचे उमेदवार प्रमोद गांधी सह मनसे सैनिक,पदाधिकारी प्रचाराचा नारळ फोडून प्रत्यक्षात प्रचाराला सुरुवात करणार आहेत, प्रत्येक गाव, वाडी वस्तीवर प्रचाराचा झंझावात असणार आहे. गेल्या काही दिवसांपासून मनसे मध्ये अनेक गावातील कार्यकर्ते मनसेत प्रवेश करत असून,येथे प्रस्थापित पक्ष,लोकप्रतिनिधींसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. गुहागर शाश्वत विकासाचे व्हीजन घेऊन, महाराष्ट्र पटलावर शांततेत लढणारा गुहागर संघ एक आदर्श मतदारसंघ म्हणून ओळख निर्माण व्हावी यासाठी प्रमोद गांधी निवडणूक रिंगणात उतरले असून, मनसे कार्यकर्ते गांधी यांच्या प्रचाराच्या जोरदार तयारीला लागले आहेत, गुहागर सत्ता परिवर्तनाच्या लढाईत प्रत्येक गाव सामील होत असल्याचे अधिक माहिती देताना तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर यांनी सांगितले.

महाराष्ट्राचा अभिमान, स्वाभिमान जागवणारा, मराठी अस्मिता, संस्कृती जपणारा, महाराष्ट्राच्या रक्षणार्थ, मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी, प्रसंगी रस्त्यावरची लढाई लढत अनेक केसेस अंगावर घेणारे मराठी हृदय सम्राट, महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राजसाहेब ठाकरे यांनी २६४ गुहागर मतदारसंघात प्रमोद गांधी यांच्या रूपाने बदल संधीचा बहुमान दिलाय. ह्या निवडणुकीच्या रिंगणात पक्षनिष्ठेला जागणारा, स्वाभिमानाने मतदारांसमोर येणारा एकमेव उमेदवार म्हणून प्रमोद सिताराम गांधी यांच्याकडे पाहिले जाते, गुहागर शाश्वत विकासाचे व्हीजन घेऊन आदर्श निवडणूक कशी लढावी आणि कशी जिंकावी याचा प्रत्येय त्यांच्या आदर्श कृतीतून दिसून येईल.

## निसर्ग अभ्यासकांना माथेरानात मोठी सुवर्णसंधी...



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०४, माथेरान :** रायगड जिल्ह्यातील थंड हवेचे निसर्ग रम्य ठिकाण माथेरान पाऊस परतल्याने हेमंत आणि शिशिर ऋत्त भहरत आहे, ह्या ऋतूत वातवरणाता गारवा रात्रीचा थंडावा निसर्गाचा जीववृष्टीला मिळलेली साथ या मुळे माथेरानच्या घनदाट जंगलामध्ये विविध वन्यजीव प्राणी पशुपक्षी फुल फुलपाखरे आनंदाने विहरताना दिसतात, नवनवीन पशु पक्षी फुलपाखरे यांना या मोसमा मध्ये आवश्यक असणारे खाद्य पदार्थ वातावरण मुबलक प्रमाणात मिळत असते. त्यामुळे माथेरानच्या जंगलामध्ये पक्षांचा किलबिलाट नवनवीन फुलपाखरांचा बागडणे वन्यजीवांचे आनंदीमय जिवन पहावयास मिळते, असेच एक पांढरे साधारण दुधी रंगाचे मोठे फुलपाखरू ग्रीन वूड बंगल्यातील पामच्या झाडावर वावरताना बागडताना बंगल्याचे केअटेकर निसर्गप्रेमी नंदकिशोर सनगरे यांना लक्षात आले. इतर फुलपाखरांपेक्षा मोठे आणि मागे शेपटी असणारे हे वेगळे फुलपाखरू बघताच मन त्याला पाहण्यासाठी धावते. तसे नंदकिशोर त्याच्या समोर गेले तसे ते फुलपाखरू येऊन त्यांच्या हातावर बसले. कित्येक वेळ ते फुलपाखरू त्यांच्या हातावरच बसून होते. वन्यजीवांना शब्दांनी संवाद साधता येत नसला तरी स्पर्शाने, गंधाने संवाद साधता येतो तसाच काही काळ का होईना तो स्पर्श दोघांनाही आनंद देऊन गेला. फुलपाखरू देवाने दिलेलं हा जीव केवळ आठ पंधरा दिवसाचे जीवनमान असले तरी प्रत्येक जीवाला आनंद देऊन जातो, फुलपाखरांमध्ये सर्वात मोठी जात पतंग या नावाने ओळखले जाते.

यानंतर या फुलपाखराचा नंबर लागतो याला मुन मोत, किंवा लान्सर मोत बोलले जाते, आपण मात्र सर्वांनाच फुलपाखरू या नावानेच ओळखतो. निसर्ग आपल्या वेळेनुसार बदल घडवत सर्व जीवसृष्टीसाठी ठरल्याप्रमाणे भरभरून देत असतो, पाऊस संपला निसर्ग भहरायला लागला आहे. माथेरान सारख्या थंड हवेच्या घनदाट जंगलाच्या ठिकाणी निसर्ग प्रेमींसाठी हा मोसम एक अविस्मरणीय ठरू शकतो.

## पवार साहेबांच्या पाठीत ज्यांनी खंजीर खुपसला त्यांना जागा दाखवणार - अभिजीत पाटील

### अभिजीत पाटलांचा पंढरपूर तालुक्यातील ४२ गावात प्रचाराचा झंजावात



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.५, पंढरपूर :** ज्यांनी पवार साहेबांच्या पाठीत खंजीर खुपसला, ऐनवेळी ज्यांनी पवार साहेबांची साथ सोडत सत्तेच्या मागे जाणे पसंत केले. शरद पवार यांचा पक्ष आणि चिन्ह हिरावून घेण्यासाठी ज्यांनी सह्या केल्या त्यांना जागा दाखवण्याची वेळ आली आहे. येत्या माढा विधानसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाला मतदान करा असे आवाहन अभिजीत पाटील यांनी काल देगाव,बिटरगाव अजूनसोंड येथील सभेत बोलताना केले.

सध्या संपूर्ण राज्यभरात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. अशातच अनेक मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशा थेट लढती पाहायला मिळत आहेत. यातील सर्वात रंगतदार लढत म्हणून माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये पाहिले जात आहे. या मतदारसंघात सलग सहा टर्म आमदार असणाऱ्या बबनराव शिंदे यांना पंढरपूर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत पाटील या एका शेतकरी पुत्राने थेट आव्हान देत जेरीस आणून सोडले आहे. तुतारी वाजवणारा माणूस या शरदचंद्र पवार गटाच्या चिन्हावर लढणाऱ्या अभिजीत पाटील यांचा सामना बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे यांच्यासोबत होणार आहे. काल अभिजीत पाटील यांच्या प्रचारार्थ बिटरगाव, अजनसोंड व देगाव या गावात गावभेट दौरे आयोजित करण्यात आले होते. अभिजीत पाटील यांच्या बोलण्याच्या शैलीमुळे तसेच तुतारी चिन्हाबद्दल लोकांमध्ये असलेल्या प्रसिद्धीमुळे अभिजीत पाटील यांच्या गाव भेट दौऱ्यांना मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. यावेळी बोलताना अभिजीत पाटील यांनी सत्ताधारी गटाचा खरपूस समाचार घेतला, यावेळी बोलताना ते म्हणाले की माढा मतदारसंघात अनेक विषय जाणिवपूर्वक प्रलंबित ठेवण्यात आलेले आहेत. गेल्या ३० वर्षात सत्ता असूनही यांना शिक्षण आणि आरोग्याचा प्रश्न सोडवता आलेला नाही. सोबतच यांनी ३० वर्षात जेवढा विकास केला नाही तेवढा विकास मला निवडून दिल्यास मी केवळ पाच वर्षात करून दाखवतो असे आवाहनही लोकांना केले. सोबतच ज्यांना पवार साहेबांनी मोठे केलं, ज्यांना गेले तीस वर्षात सत्तेत भागीदारी दिली, त्याच लोकांनी साहेबांची ऐनवेळी साथ सोडत विरोधात जाणे पसंत केले होते. मात्र आता निवडून येणे शक्य नसल्याचे त्यांना दिसू लागल्यानेच त्यांनी तुतारी मिळावी यासाठी पवार साहेबांची उंबरे झिजवले मात्र गेल्या ३० वर्षात कसलाच विकास न केल्यामुळे त्यांना तिथूनही रिकाम्या हाताने परत यावे लागले इथेच त्यांचा पराभव झाला असा घणाघात त्यांनी आ.शिंदे यांच्यावर केला. पवार साहेबांनी एका सामान्य शेतकरी कुटुंबातील पोराला उमेदवारी देऊन आशिर्वाद दिला आहे.

अनेक वक्त्यांनी बोलतांना सांगितले की दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून अभिजित पाटील यांची ओळख निर्माण झाली आहे.माढा मतदारसंघातील जनता अभिजीत पाटील म्हणजे अशेच किरण म्हणून पाहत आहेत. यावेळी अनेक प्रमुख मान्यवर तसेच शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. अशा मध्येच ४२ गावांमध्ये अभिजीत पाटील यांनी प्रचारामध्ये आघाडी घेतल्याचे दिसून आले.

## हदगाव विधानसभा मतदार संघासाठी २४ उमेदवार निवडणूक रिंगणात




**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०४, हदगांव (नांदेड)**

हदगाव -हिमायतनगर विधानसभा निवडणुकीसाठी छाननी अंती ६३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते.उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या (काल दि.४ नोव्हे) शेवटच्या दिवशी ३९ उमेदवारांनी नाम निर्देशन पत्र मागे घेतल्याने आता २४ उमेदवार हदगाव- हिमायतनगर विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी रिंगणात राहिले आहेत. निवडणूक रिंगणात असलेले उमेदवारात माधवराव निवृत्तीराव पवार इंडियन नॅशनल कॉग्रेस, संभाराव उर्फ बाबुराव गुणाजीराव कदम शिवसेना, गणेश देवराव राऊत बहुजन समाज पार्टी,दिलीप आला राठोड वंचित बहुजन आघाडी, विलास नारायण सावते आझाद समाज पार्टी (कांशीराम), माधव दादाराव देवसरकर महाराष्ट्र स्वराज्य पक्ष,बापूराव रामजी वाकोडे राष्ट्रीय समाज पक्ष, अनिल दिगंबर कदम प्रहार जनशक्ती पक्ष,विजयकुमार सोपानराव भरणे अपक्ष, विश्वनाथ भाऊराव फळेगावकर अपक्ष, प्रकाश विठ्ठलराव घून्नर अपक्ष, श्रीनिवास वैजनाथ पोतदार अपक्ष, गजानन बापूराव काळे अपक्ष, दिलीप उकडंराव सोनाले अपक्ष, शेख अहेमद शेख उमर अपक्ष, गंगाधर रामराव सावते अपक्ष, लता माधवराव फाळके अपक्ष, माधव मोतीराम पवार अपक्ष, गौतम सटवाजी डोनेराव अपक्ष, दिलीप ग्यानोबा धोपटे अपक्ष, राजू शेषेराव वानखेडे अपक्ष, आनंद होणाजी तिरमिडे अपक्ष, अभिजीत विठ्ठलराव देवसरकर अपक्ष, प्रा.डॉ.अश्विनकुमार पुरभाजी क्षीरसागर पाटील कोळीकर अपक्ष यांचा समावेश आहे.

आज निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्याऱ्या उमेदवारात माजी खा.सुभाष वानखेडे, डॉ.रेखाताई दतात्रय चव्हाण, शेख जाकेर शेख महुमद चाऊस, अजित खान मन्सूर खान पठाण, अन्वरखान नुरुद्दीन खान, अब्दूल समद खान हाजी जलाल, अभिजीत गोदाजीराव मुळे, अशोक पांडूरंग राठोड, उत्तम रामा गायकवाड, उद्धव दाजीबाराव देशमुख सुर्यवंशी, ओमकार माधवराव हंडेवार, करण उत्तमराव गायकवाड,गजानन आनंदराव शिंदे, गणपत प्रकाशराव पवार, तुकाराम रामजी चव्हाण, दत्तत्रय पांडूरंग आनंतवार, दिगंबर रामराव सुर्यवंशी,दिनेश विजय श्रीरामजवार, दिनेश विनायक रावते, देविदास नागनाथ स्वामी,निळकंठ मुकिंद कल्याणकर, पांडूरंग दावजी दुधाडे, प्रमोद राजाराम वानखेडे, बाबुराव मुनेश्वर, बालाजी परसराम वाघमारे, बालाजी भगवान पऊळ, मनोज मधुकरराव कदम, अर्ध ॲड.मारोतराव कान्होबाराव हूके पाटील, मीर मसरत अली मीर नाझीम आली.

रमाकांत दत्तात्रय शिंदे, रमेश माधवराव नरवाडे, राजू कोंडबा राऊत, ॲड.रामदास शिवराम डवरे, वैशाली मारोतराव हूके पाटील, सरोज नंदकिशोर देशमुख, सुनिता माधव देवसरकर, सुभाष मारोतराव जाधव, ॲड.संतोष उत्तमराव टिकोरे, ज्ञानेश्वर कोंडबाराव गुध्दटवार यांचा समावेश आहे असे निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेखा नांदे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी टेमकर यांनी कळविले असल्याचे मीडिया कक्षातून ए.एम. तामसकर, अनिल दस्तूरकर यांनी कळविले आहे.

